श्री.सानप अनिल जयसिंगराव ,शाखा अभियंता,
जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव यांचे गैरवर्तनाबाबत
पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश जा.क्र. ग्रापापु/आस्था-१/४५०/२०२५
अहिल्यानगर दिनांक ०३/१२/२०२५

संदर्भ:-१.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) (अ)

ज्या अर्थी श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव यांचेकडे ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग पाथर्डी येथील उपअभियंता पदाचा प्रभारी कार्यभार असताना त्यांचे विरुध्द कार्यालयीन कामकाजाबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सकृतदर्शनी श्री.सानप हे दोषी आढळून येत असल्याचे निदर्शनास आले आहे.सदर गैरवर्तण करुन श्री.सानप शाखा अभियंता यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केला आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ३(१) (अ) मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव यांना सदरचा आदेश बजावलेच्या दिनांकापासुन जिल्हा परिषद सेवेतुन शाखा अभियंता पदावरुन सेवा निलंबीत करित आहे.

श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव यांचे सेवानिलंबन आदेश आंमलात राहील तेवढया कालावधीत त्यांचे सेवानिलंबन कालावधीतील मुख्यालय जि.प.सा.बा.उपविभाग-नेवासा येथे राहील.त्यांना सेवानिलंबन कालावधीत उपअभियंता जि.प.सा.बा.उपविभाग--नेवासा-यांचे पुर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत.निलंबन कालावधीत श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता यांनी खाजगी नोकरी अथवा कोणताही व्यवसाय करुन नये तसे केल्यास ते सेवानिलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र राहतील.

सेवानिलंबनाच्या कालावधीत श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता यांना सेवा निलंबन निर्वाह भत्ता ज्या वेळी देण्यात येईल तेव्हा त्यांनी कोणतीही खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा खाजगी उदयोग अथवा

Scanned with OKEN Scanner

व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र उपअभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव यांना सादर करावे. श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता यांना सेवा निलंबन कालावधीतील निर्वाहभत्ता अदा करण्याची कार्यवाही उपअभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव हे करतील.या आदेशाची नोंद संबधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र.--202512031400027-------असा आहे.

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति,**

श्री.सानप अनिल जयसिंगराव, शाखा अभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव
व्दारा- उपअभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव
**प्रत:-** उपअभियंता जि.प.सा.बा.उपविभाग शेवगाव
२/- सदर सेवा निलंबन आदेश श्री.सानप अनिल जयसिंगराव शाखा अभियंता यांना तात्काळ बजावून दिनांकित स्वाक्षरी घेण्यात यावी व त्याची पोहच विना विलंब सादर करावी.

**प्रत:-** उपअभियंता जि.प.सा.बा.उपविभाग---नेवासा-- जि.अहिल्यानगर
२/- श्री.सानप अनिल जयसिंगराव सेवा निलंबित शाखा अभियंता आपले मुख्यालयी हजर झालेचा अहवाल सादर करावा.

**प्रत:** कार्यकारी अभियंता जि.प.सा.बा.विभाग (उत्तर/दक्षिण) यांना माहिती व कार्यवाहीसाठी
**प्रत:** गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती शेवगाव यांना माहिती व कार्यवाहीसाठी

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

Scanned with OKEN Scanner